# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/10/2022 (बुधवार)

## श्री. विशाल आनंद भा.पो.से. यांनी पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण पदाचा कार्यभार स्विकारला

दि. २६/१०/२०२२ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलामध्ये नवनियुक्त पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद यांचे आगमण झाले असून त्यांनी मावळते पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर यांचेकडून पदभार स्विकारला आहे. श्री विशाल आनंद हे सन २०१४ बॅचचे आय.पी.एस. अधिकारी आहेत. त्यांनी यापुर्वी बिड जिल्हयातील अंबेजोगाई चे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणुन कार्य केले आहे. तसेच सोलापूर जिल्हयात पंढरपूर येथे अपर अधीक्षक पदावर कार्यरत होते. मागील ४ वर्षापासून त्यांनी महाराष्ट्र राज्याचे सन्माननिय राज्यपाल यांचे परिसहायक म्हणुन कार्य केले आहे. पोलीस अधीक्षक यांनी कार्यालयातील सर्व शाखेमध्ये भेट देवून निरीक्षण केले व आवश्यक सुचना दिल्या.




**श्री विशाल आनंद, भापोसे, पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण**

## अवैध जुगार अड्डयावरील धाडीत १७ जुगारी इसमांना पारशिवनी पोलीसानी ताब्यात घेवन ४,५४,१६०/— रुपयांचा मुद्देमाल केला हस्तगत.

**१) पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत दिनांक २६/१०/२०२२ रोजी मौजा बखारी शिवारात पारशिवनी पोलीस पेट्रोलिंग करित असतांना त्यांना माहीती मिळाली कि, मौजा बखारी शिवारातील संजय पांडे रा. बखारी यांचे गोठयात काही जुवारी ईसम ५२ तास पत्त्यावर पैश्याची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. त्यावरुन पोलीसांनी मिळालेल्या माहितीचे आधारे धाड टाकली असता त्यांना एकुण १७ ईसम व दोन विधी संघर्षग्रस्त बालक हे जुगाार खेळतांना मिळुण आले. त्यांचे नाव १) जिब्रान वल्द युसुफ इक्बाल कुरैशी वय 29 वर्ष रा. खेतान मोहल्ला, मदन चौक जवळ, कामठी, २) जय परमजीत शर्मा वय 22 वर्षरा. खदान नं. 6 , कन्हान, ३) सुमितप्रकाश महल्ले वय 21 वर्ष रा. दुर्गामंदिर जवळ, कामठी, ४) जितु अशोक जैवार वय 32 वर्ष रा. येरखेडा, कामठी , ५) कुणाल हरिदास डहाट वय 34 वर्ष रा. नया नगर कामठी , ६) शुभम अशोक भाईमारेवय 29 वर्ष रा. येरखेडा, कामठी, ७) तितेश अशोक कन्नाके वय 27 वर्ष रा.चित्रंजन नगर कामठी, ८) निलेश मुनेश नानेट वय 35 वर्ष रा. नया गोदाम कामठी, ९) सुरज भैय्यालाल केराम वय ३५ वर्ष रा. चित्रंजन नगर कामठी, १०) पवन प्रेमशंकर पांडे वय 36 वर्ष रा. रायनगरकन्हान, ११) मोहम्मद गुलरेज उर्फ गोलू वल्द नझीर शेख वय 39 वर्ष रा. काली पलटण बंगला नं.101 कामठी , १२) विजय आसराजकोंडावार वय 34 वर्ष रा.कामठी, १३) मुकेश राजाराम चौधरी वय 49 वर्षरा. कामठी, १४) राज विजयधरोड वय32 वर्ष रा. गणपती नगर झिंगाबाई टाकली, नागपूर, १५) पंकज शिवरामजी शर्मा वय 40 वर्ष रा. कामठी, १६) सहानंद बिजानंद शेंडे वय 19 वर्ष रा. सतरापूर कन्हान १७) निशांत राजू बढेल वय 36 वर्ष रा. नया गोदाम कामठी व दोन विधीसंघर्ष ग्रस्त बाल कांना ताब्यात घेण्यात आले व त्यांचे कडून नगदी 53,340/- रु, ६ मोटर सायकल , १३ मोबाईल फोन व जुगार खेळ णे उपयोगी मुद्देमाल असा एकूण 4,54,160 /- रु चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांवर कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक साहेब नागपूर (ग्रामीण) श्री. विशाल आनंद साहेब, मा. अपर पोलीस अधीक्षक साहेब नागपूर (ग्रामीण ) श्री. राहुल माकणीकर साहेब, मा. सहाय्यक पोलीस अधीक्षक साहेब तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग श्री.आशीत कांबळे यांचे मार्गदर्शनात , पो.नि/ राहुल सोनवणे , पो हवा/ मुदस्सर जमाल , पोहवा/ संदीप कडू,पो हवा/ रवींद्र बर्वे , पो अं/ महेश फुलझेले , पो अं/ महेंद्र जळीतकर,पोअं/ विजय काकडे चालक स.फौ / प्रमोद कोठे यांनी केली.



## चोरी

**१) पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत दिनांक २६/१०/२२ रोजी फिर्यादी श्री अनिस अहमद मंजुर अहमद खान वय ५४ रा कोराडी नाका, मानकापुर हे त्यांचे अनिस मेडीकल मधील ३,४ दिवसाची व्यवसाया विक्रीवरील पैसे अंदाजे ४५,००० रु. व गाडीचे लायसन्स, मुळ कागदपत्र असे एका काळया रंगाच्या रेगझीन बॅगमध्ये घेवुन त्यांचा मित्र अतुल देवरावजी वाळेकर सोबत अल्टो कारचे मागचे सिटवर ठेवले असता कार पंक्चर असल्याचे दिसुन आल्याने खापरखेडा येथील ताज अम्मा ऑटो मोबाईल दुकानात घेवुन जावुन स्टेपनी बदलुन दुकानात पैसे देण्यासाठी गेले असता सदरची बॅग ही कोणीतरी अज्ञात चोराने गाडीचे मागचे दार उघडुन चोरुन नेल्यानं फिर्यादीच्या दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात ईसमावर पोलीस स्टेशन खापरखेडा येथे गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पो.हवा उमेश ठाकरे बं नं १०६ पो स्टे खापरखेडा मो नं ९८२२७६४९९९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कुही** :– अंतर्गत दिनांक २२/१०/२२ चे मध्यरात्री दरम्यान काही अज्ञात चोरटयाने मौजा कळमना व्यकटेश सिटी गेटच्या समोर ठेवलेले विज वाहणीचे ११ मीटरचे ७ लोखंडी पोल किं. ८८००० रू., १० मिटरचे ०१ लोखंडी पोल किं. १२७०० रू., ९ मिटरचा ०१ लोखंडी पोल किं. ६१०० रू. असा एकुण १,०६,८०० रू. चा माल चोरी गेल्याबाबत आर.डी. ईलेक्ट्रीकल्स यांच्याकडुन पेटी कॉन्ट्रक्टर म्हणुन काम घेतलेले फिर्यादी श्री तुषारकुमार रेवनलाल पारधी, वय ३४ वर्ष, रा. प्लॉट नं. २६, बहादुरा ग्रामपंचायचे मागे, पांदन रोड, श्रीनगर, बहादुरा, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात ईसमावर पोलीस स्टेशन कुही येथे गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास स.फौ./१४५३ विजय कुमरे, पोलीस स्टेशन कुही मो.नं. ९८२३९७१४५३ हे करीत आहे.

## दुखापत

**३) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत दिनांक २६/१०/२०२२ फिर्यादी श्री राजेश प्रकाश कारोकर वय ४२ रा. वंडली सावरकर यांचेसोबत आरोपी १) सुधाकर निर्मल २) पदमाकर निर्मल ३) भुषण निर्मल ४) सचिन निर्मल चारही रा.वंडली सावरकर यांनी संगणमत करुन जुन्या वादाच्या कारणा वरून फिर्यादी सोबत झगडा भांडण केले व फिर्यादीस हातबुक्कीने मारपीट करुन त्याचे आईला काठीने व भाऊ वडील यास दगडाने मारून जख्मी करुन दुखापत पोहचविली. सदर प्रकरणी आरोपीविरुध्द पो.स्टे काटोल येथे गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा पोहवा गौरव आगरकर ब. न. ८९१ मो न. ८४२१७५५८४९ हे करीत आहे.

## पळवुन नेणे

**४) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत दिनांक २६/१०/२०२२ फिर्यादी श्री अमरसिंग राजहंस खडसे वय ३५ रा. वाघधर वाडी बरफ फॅक्ट्रीचे मागे वार्ड क्र. १ कन्हान त. पारशिवनी. फिर्यादी यांचा मुलगा जितु अमरसिंग खडसे वय १२ वर्ष हयास दिवाळीचे सुटया लागल्या असुन बकरी चारायला का गेला नाही असे डंडाकाठी उचलुन धाक दाखविले असता सदरचा अल्पवयीन मुलगा घरुन निघुन गेला तो घरी परत नाही. त्याचा सर्वत्र शोध घेण्यात आला, परंतु मिळून न आल्याने त्यास कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन किंवा पैश्याचे आमीष दाखवुन पळवुन नेल्याचे फिर्यादीचे रिपोर्ट वरून गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पो.हवा जयलाल सहारे ब.न. १६८ मो.न. ९३०९९६६३९२ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

५) पो.स्टे. केळवद:— अंतर्गत दिनांक २५/१०/२०२२ रोजी सावनेर ते केळवद हायवे रोडच्या बाजुला एन एच. ५४७ कबीर पेट्रोल पंपाजवळ मौजा परसोडी शिवारात अज्ञात ट्रॅक्टर चालक याने त्याचे ताब्यातील लाल पांढ—या रंगाचे स्वराज ७४४ एफई ट्रॅक्टर व नंबर प्लेट नसलेली ट्रॉली कोणतीही उपाय योजना न करता सार्वजनीक वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत अंधारात उभी केली असता मागुन येणारी होंडा शाईन मो सा क्र एम एच ४० बी. वाय ५६४७ चा चालक विजय सदु अटकुम वय २१ वर्ष रा. वार्ड क्र.०२ मंगसा हयास रोडवरील अंधारात उभी असलेली ट्रॉली दिसुन न आल्याने ट्रॅक्टर ट्रॉलीला मागुन धडक मारुन मो.सा. चालक हा गंभीर जखमी होउन मरण पावल्याने फिर्यादी सदू बलजु अटकुम वय ४७ वर्ष रा. वार्ड क्र.२ मंगसा ता. सावनेर जि. नागपूर चे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपी अज्ञात ट्रॅक्टर चालक चालकाविरुध्द गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास स.फौ किशोर ठाकरे ब.नं. १५४७ पो.स्टे. केळवद मो.नं ८००७४९२६५६ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

६) पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत दिनांक २३/१०/२०२२ रोजी मृतक गिरीधर जिझोते, वय ६५ वर्ष रा. गुगुलडोह ही रामटेक वरून आपल्या मुलाचे मो.सा.क्र. एमएच ४० ए ई १८९२ वर मागे बसुन रामटेक येथुन आपल्या राहते गावी गुगुलडोह कडे जात असता सितारा हॉटेल रामटेक येथे मागुन येणा—या अज्ञात मोसा ने आपल्या ताब्यातील मो.सा. भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मागुन धडक दिल्याने मृतक हि खाली पडली व तिचा पायाला मार लागल्याने तिला उपजिल्हा रूग्णालय रामटेक येथे नेले असता रेफर केल्याने मेडीकल हॉस्पीटल नागपुर येथे भर्ती केले असता उपचारादरम्यान दि. २५/१०/२०२२ चे सकाळी ०९/३० वा. मरण पावल्याने अज्ञात मो.सा. चालकाविरुध्द पोलीस स्टेशन रामटेक येथे गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि संजय खोब्रागडे पो.स्टे. रामटेक मो.न. ९८९०२२२८४९ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. जलालखेडा :— अंतर्गत दि. २५.१०.२२ रोजी रात्री २१/३० वा सुमारास ९ महीन्याची गर्भवती मृतक सौ रेखा संजय तोरणकर वय ३३वर्ष रा भिष्णुर हि आपले घरी दिवाण वर झोपली असता अचानक दिवाण वरून पोटाचे भागाने ,खाली पडल्याने बेशुध्दावस्थेत तिचे पती संजय तोरणकर याने तिला ॲम्बुलन्सने प्रथम पी एच सी भिष्णुर येथे नेले तेथुन काटोल रूग्णालय येथे उपचारा करीता नेले असता डॉ नी तपासुन मृत घोषित केले. फिर्यादीचे पती संजय गुलाबराव तोरणकर वय ४४ वर्ष रा भिष्णुर मो क्र ९३०७८८९१६१ ने पो स्टे ला रिपोर्ट दिल्याने सदर प्रकरणी पो. स्टे. काटोल शहर येथून कागदपत्रे प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला. सदर प्रकरणी पो.स्टे. जलालखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ अनिल जोशी ब न ५२६ पोस्टे जलालखेडा मो क्र ७४९९७६०७२८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**